नियमित फौजदारी खटला नं.७७८/२०२२
निशाणी- १०

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- पांडुरंग मारुती काळे
वयः- ४४ वर्षे, धंदाः- भाजीपाला विक्री
राहणार- श्रेयसनगर, तपोवन रोड, अहमदनगर.

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री.ए.एस.यादव यांचेकडूनः-</u>

१. मी श्रेयसनगर तपोवन रोड येथे राहायला असुन घरी मी, दोन मुली, एक मुलगा आणि पत्नी असे राहतो. आमच्या घरासमोर मोठा पटांगण आहे. मी आरोपी अशोक गितेला घटनेनंतर ओळखायला लागलो. दि.२१-०१-२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० चे दरम्यान मी कामावरुन आलो. मी घरी जेवण केले आणि मुलगी बाहेर भांडे घासत होती. पटांगणात अशोक गिते आणि त्याच्यासोबत असलेले ४-५ लोकांचे भांडण चालू होते. मी त्यांना म्हणायला गेलो की, भांडण करु नका त्यावर अशोक गितेने शिवीगाळ चालू केली व धक्काबुक्की केली. त्यानंतर मी घरी निघुन आलो. अर्धा तासानंतर अशोक गिते, त्याचा भाऊ सोमनाथ गिते व ८-१० लोक माझ्या घरात घुसले व मला लाथाबुक्क्याने मारहाण केली. मुलगी गायत्री काळे भांडण सोडवण्यास आली असता तिला पण शिवीगाळ केली. त्यांनी म्हटले की, आमच्या नादी लागला तर जिवाने मारुन टाकू. त्यानंतर मी तोफखाना पोलीस ठाण्याला जावून फिर्याद दिली. फिर्याद मला दाखवली. त्यावर माझी सही असून मजकुर बरोबर आहे. त्यास <u>नि.क्र.११</u> देण्यात आली. नकाशात दाखवल्याप्रमाणे घटनेचे ठिकाण बरोबर आहे. मला मुकामार लागला होता. मी आरोपी अशोक गितेला ओळखू शकतो.

<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती. गर्जे यांचेकडूनः-</u>

नि.क्र.१२ वरील आदेशान्वये उलटतपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत, समक्ष,

(म.सी.तिवारी)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

(म.सी.तिवारी)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.१७/१२/२०२२.

शपथेवर उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. गर्जे यांचेकडून:-

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २१/०१/२०२२ रोजी माझ्या घरासमोर जे वाद चालले होते त्या लोकांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपींशी वैयक्तीक ओळख नाही व त्यांना बघितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला ज्या अनोळखी लोकांनी शिवीगाळ व धक्काबुक्की केली होती त्यावेळेस सदर दोन्ही आरोपी तेथे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला ज्या अनोळखी लोकांनी घराच्या आतमध्ये शिवीगाळ व धक्काबुक्की केली होती त्यावेळेस सदर दोन्ही आरोपी तेथे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा अनोळखी लोक घरात घुसले व भांडणे सुरु झाले तेव्हा आजुबाजुचे बरेच लोक तेथे जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या लोकांनी मला अशोक गिते व त्याचा भाऊ होता असे सांगितले त्याप्रमाणे मी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालया समक्ष हजर असलेल्या दोन्ही आरोपींनी मला व माझ्या मुलींना शिवीगाळ केली नाही व धक्काबुक्की केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यामधील वाद न्यायालयाबाहेर मिटले आहेत व मला आता त्यांचेविरुध्द काही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचा लेखी समझोता मी अभिलेखावर दाखल केला आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:45:34 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:45:40 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.०९/०३/२०२६.

नियमित फौजदारी खटला नं.७७८/२०२२
निशाणी- २२

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- गायत्री पांडुरंग काळे
वयः- २१ वर्षे, धंदाः- शिक्षण
राहणार- श्रेयसनगर, तपोवन रोड, अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. दि.२१-०१-२०२२ रोजी काय घटना झाली होती याबाबत मला माहिती नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

(साक्षीदार सरकार पक्षाला सहाय्य करीत नसल्यामुळे सरकार पक्षाच्या विनंतीवरुन साक्षीदारास उलटतपासणीची परवानगी देण्यात आली.)

उलटतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचे मार्फतः-

२. मला जबाबामधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचून दाखविला. सदर बाबी मी पोलीसांना सांगितल्या नव्हत्या. सदर बाबी जबाबामध्ये का नमुद केल्या याचे कारण मला सांगता येणार नाही.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. गर्जे यांचेकडूनः-

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:48:31 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:48:37 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.०९/०३/२०२६.

नियमित फौजदारी खटला नं.७७८/२०२२
निशाणी- २३

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- श्रृती संजय काळे
वयः- १८ वर्षे, धंदाः- शिक्षण
राहणार- श्रेयसनगर, तपोवन रोड, अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. दि.२१-०१-२०२२ रोजी काय घटना झाली होती याबाबत मला माहिती नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. माझ्या वडिलांचे नाव संजय मारुती काळे असे आहे परंतु माझ्या बयानामध्ये चुकीने पांडुरंग काळे असे नमुद केले आहे.

(साक्षीदार सरकार पक्षाला सहाय्य करीत नसल्यामुळे सरकार पक्षाच्या विनंतीवरुन साक्षीदारास उलटतपासणीची परवानगी देण्यात आली.)

उलटतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचे मार्फतः-

२. मला जबाबामधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचून दाखविला. सदर बाबी मी पोलीसांना सांगितल्या नव्हत्या. सदर बाबी जबाबामध्ये का नमुद केल्या याचे कारण मला सांगता येणार नाही.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. गर्जे यांचेकडूनः-

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:48:44 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:48:50 +0530

(एल. एस. पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.०९/०३/२०२६.